स्पेशल दिवाणी दावा कं.१४४/२०१७
(जुना स्पे.दि.दावा कं.१६४/२०१५)
चंद्रशेखर वि. अब्दुल+१
नि.क.४८

DISTRICT COURT NAGPUR

## साक्षीदाराचा उलटतपास शपथेवर ॲड.एस.के.लिखीते प्रतिवादीतर्फे पुर्ववत सुरू

५. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीखत करून घेण्यालायक माझी आर्थिक परिस्थिती नव्हती व मी खरेदीखत करून घेण्याचे परिस्थितीमध्ये नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, माझे बॅंकखात्यामध्ये कुठलीही रक्कम शिल्लक नसतांना मी प्रतिवादी कं.१ याला रूपये १,२५,०००/- चा धनादेश दिला. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादी कं.१ यास वेळोवेळी ईसारादाखल रू.४,२५,०००/- दिल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादी कं.१ यास ईसारादाखल फक्त रू.३,००,०००/- देवुन माझे मुलाच्या वैद्यकीय उपचाराकरीता पुन्हा रू. २५,०००/- परत घेतले. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादी कं.१ यास वेळोवेळी चुकीचे व खोटे नोटीस पाठविले. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी कं.१ यांनी प्रतिवादी कं.२ यांना करून दिलेले विक्रीपत्र कायदेशिर आहे. हे मला माहिती नाही की, माझे सोबत व्यवहार केला तेव्हा प्रतिवादी कं.१ यांचे घरामध्ये आर्थिक अडचण होती. प्रतिवादी कं.१ यांना मुलीच्या लग्नाकरीता पैश्याची आवश्यकता होती व त्यामुळे त्यांनी वादातील प्लॉट विक्रीस काढला होता हे मला माहिती नाही. प्रतिवादी कं.१ यांनी वादातील प्लॉट एकापेक्षा जास्त लोकांना विकण्याचा सौदा केल्यामुळे मी प्रतिवादी कं.१ यांच्याविरूध्द पोलिसांकडे तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी कं.१ यांनी प्रतिवादी कं.२ यांना विक्री केलेली मालमत्ता मला हडप करायची असल्यामुळे मी खोटा दावा दाखल केला.

## साक्षीदाराचा उलटतपास ॲड.ए.बी.पोंगडे प्रतिवादी कं.२ तर्फे

६. वाद प्लॉटबाबत माझा प्रतिवादी कं.१ सोबत करार झालेला असल्याबाबत मी करार केला तेव्हापासुन ते सन २०१५ पर्यंत पेपरमध्ये जाहिर

नोटीस दिलेली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, दावा दाखल केल्यानंतर प्रतिवादी क्रं.१ याने वाद प्लॉट ईतर कोणालाही विकु नये याबाबत मी न्यायालयाकडुन मनाई हुकूम प्राप्त करून घेतला नव्हता. मी दाखल केलेल्या दाव्यामध्ये प्रतिवादी क्रं.२ हा प्रामाणिक विकत घेणार नाही आहे असा उल्लेख नसल्याचे मला माहिती नाही. मी करार केला तेव्हा वादातील प्लॉटवर प्रतिवादी क्रं.१ याने दोन कच्च्या टिनाच्या रूम बांधल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्रं.२ याने वादातील प्लॉट विकत घेतल्यानंतर सदर दोन रूम पाडल्या. वादातील दावा प्रलंबित असल्याबाबत मी दुयम निबंधकाकडे नोंद केल्याचे मला माहिती नाही.

७. प्रतिवादी क्रं.१ सोबत मी केलेल्या करारनाम्यामध्ये कच्च्या बांधकामाचा उल्लेख केलेला होता. हे म्हणणे खरे नाही की, माझा प्रतिवादी क्रं.१ सोबत झालेला करार हा संपुष्टात आल्यामुळे प्रतिवादी क्रं.१ याने प्रतिवादी क्रं.२ सोबत वाद प्लॉट विक्रीचा नविन करार केला. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्रं.२ यांना दाव्यात पार्टी करण्यापुर्वी मी वकीलांमार्फत नोटीस पाठविला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्रं.१ यांनी प्रतिवादी क्रं.२ यांना करून दिलेले विक्रीपत्र कायदेशिर आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्रं.२ हे प्रामाणिक खरेदीदार आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मालमत्तेच्या भावामध्ये वाढ झाल्यामुळे मी खोटा दावा दाखल केला. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास संपला.</u>**
**<u>फेरतपास काही नाही.</u>**

समक्ष

श्रवणोत्तर स्विकृती

(एस. के. फोकमारे)
दि.न्या.व.स्तर, उमरेड
दिनांक : १९/०८/२०१९

(एस. के. फोकमारे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर., उमरेड

DISTRICT COURT NAGPUR